प्रकरण ६ वे

# निष्कर्ष व सारांश

# निष्कर्ष व सारांश

भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. जवळजवळ ७०% लोकसंख्या आजही ग्रामीण भागात राहते. म्हणून कोणत्याही आर्थिक अगर सामाजिक सुधारणांच्या प्रक्रियेत ग्रमीण लोकसमूहाला सामावून घेतल्याशिवाय देशाची प्रगती होणे अशक्य आहे. ही गोष्ट डॉ. अमर्त्य सेन व मकबूल हक यांच्या मानवी विकास निर्देशांक संकल्पनेमुळे अधोरेखित झाली. भारताच्या दरडोई उत्पन्नातून देशाची निश्चित स्थिती कळू शकत नाही. कारण भारत दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत अमेरिका व युरोपीय देशांच्या पाठोपाठ असला तरी मानवी विकास निर्देशांकातील त्याचे स्थान शेवटी आहे. १९९१ ते २००० हे दशक आर्थिक सुधारणांचे व विकासाचे दशक म्हणून ओळखले जाते. याचवेळेस ग्रामीण समूहांची आरोग्य व स्वच्छताविषयक स्थिती सुधारल्याशिवाय ग्रामीण भागाचा खऱ्या अर्थाने विकास होऊ शकत नाही. ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली. या दिशेने करण्यात आलेल्या प्रयत्नांपैकी स्वच्छता व आरोग्यविषयक कार्यक्रम हा प्रमुख व मूलगामी प्रयत्न मानता येईल.

स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच किंबहुना त्यापूर्वीही अनेक समाजसुधारक व विचारवंतांनी ग्रामीण स्वच्छतेच्या प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला होता. परंतू हा प्रयत्न विशिष्ट विभागांमध्ये व निवडक लोकांच्या व्यक्तीगत उपक्रमांच्या स्वरुपामध्ये होता. स्वातंत्र्यानंतर स्वच्छता व आरोग्य याबाबत अनेक कार्यक्रम आखण्यात आले. या सर्व कार्यक्रमांचे उद्दिष्ट लोकांना स्वच्छता राखण्यासाठी आर्थिक मदत देणे असे होते. त्यामुळे केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम (सीआरएसपी) या कार्यक्रमास अनुदानाधारित (subsidy driven) कार्यक्रम असे संबोधले जाते. या कार्यक्रमांतर्गत अनुदान देऊन लोकांना शौचालये बांधण्यास उद्युक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतू या कार्यक्रमाचा वेग अपेक्षेइतका न वाढल्याने जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम, जागतिक बँक, जल व स्वच्छता कार्यक्रम-दक्षिण आशिया (W.S.P.-S.A.) या संस्थांनी अनुदानाधारित

कार्यक्रमाऐवजी मागणी आधारित कार्यक्रम सुरू करण्यासाठी प्रोत्साहन व आर्थिक अनुदान पुरवले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे लोकांना रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान देण्याऐवजी शास्त्रीय पद्धतीने माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमाचे आयोजन करून लोकांच्यामध्ये जागृती घडवणे व आरोग्य आणि स्वच्छता या गोष्टींकडे त्यांचे लक्ष केंद्रित करणे. माहिती, शिक्षण व संवाद हा कार्यक्रम लोकांना नवीन गोष्टी स्वीकारण्यास मदत करतो व समाजामध्ये वर्तन बदल घडवितो. ही गोष्ट संयुक्त राष्ट्र संघाच्या अन्न व शेती संघटनेने आपल्या दक्षिण आफ्रिकेतील अनुभवावरून अधोरेखित केली होती. तसेच माहिती, शिक्षण व संवादाचा आरोग्य क्षेत्रात केलेला वापरही उत्साहवर्धक होता. म्हणून भारत सरकारने या शतकातील अत्यंत महत्वाकांक्षी असा संपूर्ण स्वच्छता अभियान हा कार्यक्रम आखला. या कार्यक्रमाने आरोग्य व स्वच्छतेच्या क्षेत्रात जवळजवळ क्रांती घडवून आणली.

महाराष्ट्र राज्य हे अनेक क्षेत्रामध्ये आघाडीचे राज्य म्हणून ओळखले जाते. तसेच संपूर्ण स्वच्छता अभियानानेही देशभरात आघाडी घेतली आहे. महाराष्ट्र शासनाने केंद्रसरकारच्या संपूर्ण स्वच्छता अभियानास बळकटी आणण्यासाठी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान या नावाखाली लोकांना भावनिक व अध्यात्मिक आवाहन केले. या कार्यक्रमांतर्गत गाव, तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर प्रोत्साहनात्मक पारितोषिके जाहीर करण्यात आली. माहिती, शिक्षण व संवादासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने अनेक अभिनव उपक्रम हाती घेण्यात आले. सांगली जिल्हा हा माहिती, शिक्षण व संवादातील अभिनव उपक्रमामध्ये आघाडीवर राहिला आहे. मानवेंद्रनाथ राय अनौपचारिक शिक्षण व संशोधन संस्था कराड, बजाज फौंडेशन पुणे, शिवसदन, सांगली या व अनेक स्वयंसेवी संस्थांनी सांगली जिल्ह्यातील माहिती, शिक्षण व संवादास अत्यंत उंचीवर नेऊन ठेवले. लोकशिक्षण जत्था, स्वच्छता रथयात्रा, कलापथके, स्वच्छता ज्योत, स्वच्छता दूत कार्यक्रम, विविध स्पर्धा व स्वच्छता तंत्रज्ञानातील मूलभूत शोध व प्रशिक्षण कार्यक्रम यामुळे सांगली जिल्ह्यातील माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरून

अल्पावधीतच शेकडो गावे हागणदारीमुक्त झाली. आकड्यांच्या भाषेतच बोलायचे झाले तर सांगली जिल्ह्यामध्ये १९९६ ते २००० या काळात १५४९ लाख रुपये खर्च करून केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत ६४,५७७ शौचालये बांधण्यात आली. परंतू माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रम राबवून लोकांच्यामध्ये प्रबोधन घडवण्यात आले व परिणामी मोठ्या प्रमाणावर मागणी निर्माण झाली. तेंव्हा माहिती, शिक्षण संवाद कार्यक्रमावर केवळ ३६.३५ लाख रुपये खर्च करून (२००१-२००६) ७१,८४६ वैयक्तिक शौचालये, ९११ शाळा स्वच्छतागृहे, ८९२ अंगणवाडी स्वच्छतागृहे व १५४ सार्वजनिक शौचालये उभारण्यात आली. विशेष म्हणजे या सर्व उभारणीसाठी सरकारला केवळ ५०० लाख रुपये खर्च करावे लागले. याचा अर्थ असा की, संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमाच्या यशस्वीतेमध्ये माहिती, शिक्षण व संवादाची कळीची भूमिका आहे. माहिती, शिक्षण व संवाद हा कार्यक्रम वर्तन बदलामध्ये प्रमुख भूमिका बजावतो; हे याद्वारे सिद्ध होते. परंतु या कार्यक्रमात अनेक उपक्रम घेता येतात. त्यापैकी काही उपक्रम माहिती संकलन व वितरणाचे असतात. काही शिक्षण व प्रशिक्षणाचे असतात तर काही थेट संवादांचे असतात. वैयक्तिक घरभेटी, गटचर्चा, ग्रामसभा, बैठका, भाषणे, मेळावे यासारखे संवादाचे उपक्रम वृत्तपत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी यासारखी लोकमाध्यमे, कलापथके, शाहिरी कार्यक्रम, पथनाट्य, नाटके, सोंगी भजने यासारख्या लोककला, प्रशिक्षणे, प्रात्यक्षिके, प्रदर्शने यासारखे अनुभव देणारे व शिक्षण देणारे कार्यक्रम या आणि अशा अनेक उपक्रमांपैकी कोणते उपक्रम जास्त परिणामकारक आहेत व कोणते कमी परिणामकारक आहेत याबाबत मात्र अद्याप संशोधन झालेले दिसत नाही. तसेच माहिती, शिक्षण व संवादाचा कार्यक्रम न राबविल्यास लोकांच्यामध्ये वर्तन बदल होत नाही किंवा तो जेथे प्रभावीपणे राबविला जातो तेथे हा वर्तन बदल निश्चितपणे दिसून येतो आणि माहिती, प्रशिक्षण व संवाद कार्यक्रमाची गुणात्मकता संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या संख्यात्मकतेशी व गुणात्मकतेशी थेटपणे निगडीत असते असे दर्शविणारे संशोधनही जवळजवळ दुर्मिळ आहे.

प्रस्तुत संशोधनात माहिती, प्रशिक्षण व संवाद कार्यक्रमाची अंमलबजावणी व संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमाची यशस्वीता या घटकांच्यामधील सहसंबंध शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आला आहे. सांगली जिल्ह्यातील अंकलखोप व कावजीखोतवाडी या दोन गावातील संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमाची अंमलबजावणी व दर्जा आणि त्या गावातील माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमाची अंमलबजावणी व दर्जा याबाबत अभ्यास करण्यात आला आहे. ८०% साक्षरता असलेले अंकलखोप हे गाव माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमाची अंमलबजावणी व संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्यामध्ये आघाडीवर आहे. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान स्पर्धेच्या केवळ दुसऱ्या वर्षातच या गावाने राज्य पातळीवरचे प्रथम पारितोषिक मिळवलेले आहे व १००% नागरिकांना शौचालय सुविधा पुरविलेली आहे. याउलट कावजीखोतवाडी हे गाव मात्र संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीत अत्यंत मागासलेले आहे. जवळजवळ ७०% नागरिक आजही उघड्यावर मलविसर्जन करतात. गोठे, घरे, रस्ते आणि परिसर हे अस्वच्छतेचे आगार असल्याचे दिसून येते. या गावामधील माहिती गोळा करताना असे आढळून आले की, या गावात माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमाचा स्पर्शही झालेला नाही. प्रस्तुत संशोधनात या दोन गावातील निवडक व्यक्तींकडून अनुसूचीद्वारे शास्त्रीय पद्धतीने तथ्यसंकलन करण्यात आले. तसेच या दोन्ही गावाचे अनेकवार भेटी देवून सूक्ष्म निरीक्षण करण्यात आले. अनुसूचीद्वारे संकलित करण्यात आलेल्या तथ्यांचे साध्या संख्याशास्त्रीय तत्त्वाद्वारे विश्लेषण करण्यात आले. आणि माहिती, शिक्षण व संवादातील विविध उपक्रमांची सापेक्ष परिणामकारकता रेन्सिस लायकार्टच्या पद्धतीने तपासण्यात आली. या संशोधनासाठी खालील उद्दिष्टे ठरविण्यात आली होती.

१. निवडलेल्या गावातील संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीतील माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमाचे स्थान व स्वरूप तपासणे.

२. निवडलेल्या गावातील विविध स्वच्छता तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीचे परीक्षण करणे.

३. माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमातील प्रात्यक्षिके व प्रशिक्षण या उपक्रमांची इतर उपक्रमांच्या तुलनेतील परिणामकारकता तपासणे.

उपरोक्त उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी योग्य ते समस्यासूत्रण करून खालील अभ्युपगम मांडण्यात आले.

१. माहिती, शिक्षण व संवाद प्रक्रिया परिणामकारक राबविल्यास लोकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छताविषयक वर्तनांमध्ये परिवर्तन होऊ शकते.

२. प्रात्यक्षिके, प्रशिक्षण व थेट संवाद ही माहिती, शिक्षण व संवाद प्रक्रियेतील सर्वात परिणामकारक साधने आहेत.

३. माहिती, शिक्षण व संवादाच्या अभावी संपूर्ण स्वच्छता अभियान यशस्वी होऊ शकत नाही.

वरील अभ्युपगम तपासण्यासाठी संकलित तथ्यांचा व निरीक्षणांचा परिणाम कारकरीत्या वापर करून खालीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले.

**निष्कर्ष**

अंकलखोप गावामध्ये अनेकवार भेटी देऊन निरीक्षण करण्यात आले. सदर निरीक्षणामधून खालील निष्कर्ष हाती आले.

१) या गावात माहिती, शिक्षण व संवादाचे शक्य ते सर्व उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. यामध्ये स्वच्छतादूत, स्वच्छताज्योत, स्वच्छता रथयात्रा, कलापथक, घरभेटी, गटचर्चा, ग्रामसभा, युवक सभा, महिला सभा, घोषणा, भित्तीपत्रके, तंत्रज्ञान प्रशिक्षणे व प्रात्यक्षिके यांचा समावेश होता. हे कार्यक्रम गावामध्ये १९९९ ते २००७ पर्यंत सलगपणे राबविण्यात आले आहेत. या उपक्रमांमुळे गावातील नागरिकांच्यामध्ये स्वच्छताविषयक जाणिवा निर्माण झालेल्या आहेत.

२) गावातील मुलांना व महिलांना स्वच्छतेचे पाच संदेश माहीत आहेत व त्यांची अंमलबजावणी बहुतेक ठिकाणी करण्यात येते.

३) गावातील सर्व लोकांना शौचालयाची उपलब्धता आहे. ज्यांना जागा आहे अशा सर्वांनी वैयक्तिक स्वच्छतागृहे बांधून घेतली असून शौचालयाला जागा नसणाऱ्या व अत्यंत गरीब नागरिकांना ग्रामपंचायती मार्फत सार्वजनिक शौचालयांची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. गावात पंधराशे वैयक्तिक शौचालये असून ६९ टक्के कुटुंबांना त्याचा लाभ होतो तर ३० टक्के कुटुंबे १११ सार्वजनिक शौचकूपांचा लाभ घेतात. गावामध्ये कोणीही उघड्यावर शौचास जात नाही.

४) गावामध्ये दोनशे वैयक्तिक गांडुळ प्रकल्प, दोन सार्वजनिक गांडुळ प्रकल्प, पंधरा नेडॅप कंपोस्ट प्रकल्प उभारण्यात आले आहेत.

५) निर्धुर चुलींच्या फायद्याबाबत व वापराबाबत योग्य ते प्रबोधन झाल्याने गावात ७५२ कुटुंबे निर्धुर चुलींचा वापर करतात.

६) गावामधील सर्व घरांमध्ये पिण्याचे पाणी तोटीच्या भांड्यामध्ये व उंचावर साठवले जाते.

७) शाळा, घरे, दवाखाने व सार्वजनिक वापराच्या इमारतींवर स्वच्छताविषयक घोषणा लिहिण्यात आल्या आहेत.

८) गावातील ७० टक्के लोकांनी स्वच्छता तंत्रज्ञान विषयक प्रदर्शने व प्रात्यक्षिके यांचा प्रत्यक्ष लाभ घेतला आहे.

९) अंकलखोप गावामध्ये एम.एन.रॉय अनौपचारिक शिक्षण व संशोधन संस्थेने तंत्रज्ञान प्रशिक्षण, टाकाऊतून टिकाऊ, मैला प्रक्रिया, युरिया रिकव्हरी प्लँट, महिला प्रशिक्षण असे अनेक विविध उपक्रम राबविले तसेच या संस्थेने आयोजित केलेला लोकशिक्षण जथ्था व निर्धार ही लोकगीताची कॅसेट याचा अतिशय चांगला परिणाम गावावर दिसून आला आहे. त्यामुळे तज्ञ व प्रशिक्षित मनुष्यबळ असलेली स्वयंसेवी संस्था लोकांच्यामध्ये स्वच्छताविषयक वर्तनबदल करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावू शकते हे दिसून येते.

१९९९ साली अंकलखोप गावामध्ये केंद्रपुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाअंतर्गत अनुदान मिळत असूनही केवळ ४० टक्के लोकांकडे वैयक्तिक शौचालयाच्या सुविधा उपलब्ध होत्या. १९९९ ते २००७ या काळात माहिती, शिक्षण व संवादाचा कार्यक्रम शास्त्रीय पद्धतीने व निर्धारपूर्वक राबविण्यात आल्याने अनुदान नसतानाही वैयक्तिक शौचालयांची संख्या ७० टक्क्यांपर्यंत वाढली. २००० साली या गावाने जिल्हा पातळीवर संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात द्वितीय क्रमांक मिळविला तर २००१-२००२ मध्ये विभागीय व राज्य पातळीवर या गावाने स्वच्छता अभियानात प्रथम क्रमांक मिळविला. ही गोष्ट माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमामुळे साध्य झालेली दिसते. यावरून माहिती, शिक्षण संवादाशिवाय संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम पुर्णपणे यशस्वी होऊ शकत नाही हे गृहीतक सिद्ध होते.

कावजीखोतवाडी हे मिरज तालुक्यातील गाव विकास, प्रबोधन व सार्वजनिक स्वच्छता या बाबतीत अलिप्त राहिलेले दिसते. या गावाच्या सर्वसाधारण निरीक्षणातून खालील निष्कर्ष प्राप्त झाले.

१) गाव बागायती असल्याने आर्थिक स्थिती बरी असली तरी गावातील साक्षरता प्रमाण फक्त ३० टक्के आहे. त्यामुळे वृत्तपत्रे, पत्रके, भिंतीवर लिहिलेल्या घोषणा यांचा बहुसंख्य नागरिकांच्या दृष्टीने काहीही उपयोग होत नाही.

२) गावामध्ये सांडपाण्याची आणि घनकचरा विल्हेवाटाची कोणतीही व्यवस्था नसल्याने शेण व केरकचरा उघड्या उकिरड्यामध्ये टाकला जातो. हे उकिरडे गावातच असल्याने डास, माशा इ. चा मोठा उपद्रव दिसून येतो.

३) गावामध्ये माहिती, शिक्षण व संवादाचे भाषणे, गटचर्चा, घरभेटी, ग्रामसभा, कलापथके, रथयात्रा, प्रशिक्षणे, प्रदर्शन किंवा प्रात्यक्षिके यापैकी कोणतेही कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे आढळून आले नाही.

४) गावातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना किंवा महिलांना स्वच्छता विषयक संदेश माहीत नाहीत, त्यामुळे त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रश्न येत नाही.

५) गावातील ३० टक्के कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये आहेत. पण ती एकतर १०० टक्के अनुदानामुळे किंवा पाहुण्यांच्याकडे पाहिल्यामुळे स्वच्छता अभियानपूर्व काळात बांधली गेली आहेत. बहुसंख्य नागरिक उघड्यावरच मलविसर्जन करतात.

६) माहिती व प्रात्यक्षिकांच्या अभावी लोकांना शौचालय, गांडुळ खत, नेडॅप कंपोस्ट व निर्धुर चुलींच्या तंत्रज्ञानाबाबत फारशी माहिती असल्याचे आढळले नाही. शेजारच्या गावी पाहिल्यामुळे गावामध्ये दोन गांडुळखत प्रकल्प उभारण्यात आले आहेत. निर्धुर चुलींची संख्या नगण्य आहे. तर एकही सार्वजनिक शौचालय नाही.

७) आर्थिक क्षमता असली तरी जाणिव जागृतीच्या अभावी आणि माहिती न मिळाल्याने लोक स्वच्छता तंत्रज्ञानाचा व सवयींचा अंगिकार करत नाहीत. यावरून माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी न झाल्यास स्वच्छता कार्यक्रम यशस्वी होत नाही. या गृहीतकास बळकटी येते.

अनुसूची पद्धतीने केलेल्या तथ्य संकलनामधून व त्याच्या विश्लेषणामधून खालील निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

१) अंकलखोप गावातील शौचालय नसलेल्या उत्तरदात्यांपैकी ६८ टक्के उत्तरदात्यांनी जागा नसल्याने शौचालये बांधली नाहीत. तर कावजी खोत वाडी मध्ये केवळ २५ टक्के लोकांनी जागा नसल्याचे कारण सांगितले. परवडत नसल्याने शौचालये न बांधणारांचे प्रमाण अनुक्रमे ३२ टक्के व ५० टक्के इतके आढळले. (आधुनिक तंत्रज्ञानाने अत्यंत कमी पैशात शौचालय बांधता येते. याबाबत कावजी खोत वाडीत माहिती नाही.) अंकलखोपमध्ये शौचालयाची गरज नाही असे वाटणारे कोणीही नाही. परंतु कावजी खोतवाडीमध्ये १८ टक्के लोकांना गरज नाही असे वाटते. अंकलखोप मधील १०० टक्के लोकांनी शौचालयाचे प्रात्यक्षिक पाहिले आहे. तर कावजी

खोतवाडीमध्ये केवळ २ लोकांनी (ते ही परगावात) प्रात्यक्षिक पाहिले. शौचालय बांधण्यासाठी प्रवृत्त होण्याच्या कारणांपैकी माहिती प्रशिक्षण व प्रात्यक्षिके महत्वाची ठरतात असे मत बहुसंख्य लोकांनी व्यक्त केले आहे.

२) अंकलखोपमध्ये ३५.७८ टक्के लोक आणि कावजी खोतवाडीमध्ये ६.६६ टक्के लोक निर्धूर चूल वापरतात. ८५ टक्के निर्धुर चूल लाभार्थींनी प्रात्यक्षिकामधून हे तंत्रज्ञान स्विकारल्याचे म्हटले आहे. शेण व घनकचरा विल्हेवाटेमध्ये अंकलखोपने शास्त्रीय पद्धतींचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात केलेला दिसतो. तेथील ९१ टक्के प्रतिसादक घनकचरा विल्हेवाटीसाठी गांडुळ खत, नेडॅप कंपोस्ट किंवा गोबर गॅस यासारख्या आरोग्य कारक पद्धतींचा वापर करतात तर कावजी खोतवाडीमधील ७ टक्के लोक अशा पद्धती वापरतात तर ९३ टक्के लोक उघड्या उकिरड्यामध्ये शेण व कचरा टाकतात. अंकलखोप मध्ये घनकचरा विल्हेवाटीच्या शास्त्रीय पद्धतीबाबत प्रशिक्षण, प्रबोधन व संवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आढळून आले. याउलट अशा कार्यक्रमांच्या अभावामुळे कावजी खोतवाडीमध्ये अनारोग्यकारक पद्धतीने शेण व घनकचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. यावरून माहिती, शिक्षण व संवाद प्रक्रिया परिणामकारक राबविल्यास लोकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छताविषयक वर्तनांमध्ये परिवर्तन होऊ शकते व प्रात्यक्षिके, प्रशिक्षण व थेट संवाद ही माहिती, शिक्षण व संवाद प्रक्रियेतील सर्वात परिणामकारक साधने आहेत ही गृहीतके सिद्ध होतात. अंकलखोप व कावजी खोतवाडी या गावामध्ये अनुक्रमे ९.४७ व २० टक्के लोकांनी सुयोग्य माहिती द्यावी म्हणजे लोक तंत्रज्ञान स्विकारतील असे म्हटले आहे तर अंकलखोप मधील ७५.७८ टक्के लोकांनी तंत्रज्ञान प्रात्यक्षिक व प्रशिक्षण कार्यक्रमामुळे लोक स्वच्छता तंत्रज्ञान स्विकारतील असे म्हटले आहे. कावजी खोतवाडीमध्ये असे मत व्यक्त करणारांची संख्या ५६.६६ टक्के इतकी आहे. यावरूनही प्रात्यक्षिके, प्रशिक्षण व थेट संवाद ही माहिती, शिक्षण व संवाद प्रक्रियेतील सर्वात परिणामकारक साधने आहेत असे सिद्ध होते.

३) वैयक्तिक शौचालय बांधलेल्या एकूण ७० प्रतिसादकांकडून त्यांच्या निर्णयास कारणीभूत असणाऱ्या घटकांबाबत माहिती घेऊन त्या माहितीचे रेन्सिस लायकर्टच्या पद्धतीने विश्लेषण केले असता प्रशिक्षण प्रात्यक्षिके व संवाद या घटकांचे टक्केवारी मूल्य अनुक्रमे ७९.४. व ६८.४. असे आढळले. याचा अर्थ असा की, वरील दोन घटक समाजाच्या स्वच्छताविषयक वर्तन बदलासाठी बहुतांशी कारणीभूत आहेत.

४) सारणी क्र. ५.१९. वरून असे दिसून येते की, सक्ती व अनुदान यांचे टक्केवारी मूल्य ४० टक्केपेक्षा कमी असल्याने हे घटक कमी प्रमाणात वर्तन बदलास कारणीभूत ठरतात. तसेच प्रसार माध्यमांच्यामुळे वर्तन बदलात मदत होत असली तरी त्याचे प्रमाण लक्षणीय नाही. यावरूनही गृहीतक क्र. ३ ला बळकटी मिळते.

५) संपूर्ण स्वच्छता अभियानातील माहिती, शिक्षण व संवाद घटकातील सापेक्ष परिणामकारकता शोधण्यासाठी ९५ प्रतिसादकांकडून रेन्सिस लायकार्ट पद्धतीने माहिती संकलित करण्यात आली. यावरून असे दिसून आले की, प्रशिक्षण व प्रात्यक्षिके, घरभेटी आणि बैठका व गटचर्चा यांचे मध्य गुणांक अनुक्रमे ३.८२, ३.९० व ३.९३ आणि टक्केवारी मूल्य अनुक्रमे ७६.४, ७८ व ७८.६ आहे. यावरून थेट संवाद प्रशिक्षण व प्रात्यक्षिके हे उपक्रम विशेष किंवा अतिशय परिणामकारक ठरतात. स्पर्धा, कलापथके, घोषणा, प्रभातफेरी, ग्रामसभा व भाषणे यांचे टक्केवारी मूल्य ५० ते ७० या दरम्यान असल्याने हे घटक मध्यम परिणामकारक आहेत. तर वृत्तपत्रे व पत्रके आणि रेडिओ हे घटक कमी परिणाम कारक आहेत. या विश्लेषणावरून गृहीतक क्र. ३ सिद्ध होते.

६) गांडुळ खत प्रकल्प उभारलेल्या २८ प्रतिसादकांकडून रेन्सिस लायकार्टच्या पद्धतीने माहिती संकलित करून तिचे विश्लेषण केले असता त्यामधून प्रात्यक्षिके व प्रसारमाध्यमे हे घटक अतिशय परिणामकारक आढळून आले व त्यांचे टक्केवारी मूल्य अनुक्रमे ९०.८ व ८०.६ इतके आहे. तर संवाद या घटकाचे मूल्य ६४.२ टक्के असल्याने हा घटक मध्यम परिणामकारक ठरतो.

अनुदान व सक्ती या दोन घटकांचे टक्केवारी मूल्य ५० टक्केंपेक्षा कमी असल्याने ते कमी परिणामकारक घटक आहेत असे म्हणता येईल.

७) निर्धूर चूल वापरणाऱ्या ३४ प्रतिसादकांकडून त्यांच्या वर्तन बदलाला कारणीभूत घटकांची माहिती घेतली असता तेथे प्रात्यक्षिके व प्रशिक्षण हा घटक अतिशय परिणामकारक आढळला. त्या खालोखाल संवाद या घटकास ६१ टक्के मूल्य प्राप्त झाल्याने तो घटक मध्यम परिणामकारक ठरतो. सक्ती व अनुदान हे घटक ५० टक्केपेक्षा कमी टक्केवारी मूल्य घेऊन कमी परिणामकारक ठरतात.

८) अंकलखोपमध्ये माहिती शिक्षण व संवादाचे सर्व कार्यक्रम झाले. कावजीखोतवाडीमध्ये माहिती, शिक्षण व संवादाचे फारसे कार्यक्रम झालेले नाहीत. अंकलखोपमध्ये १०० टक्के शौचालय उपलब्धता आहे. यामध्ये ६९ टक्के वैयक्तिक शौचालये असून ३१ टक्के सार्वजनिक शौचालये आहेत. अंकलखोपमध्ये २०० वैयक्तिक गांडुळखत प्रकल्प व २ सार्वजनिक गांडुळखत प्रकल्प, १५ नेडॅप कंपोस्ट तर ७५२ निर्धुर चुलींची संख्या आढळली. कावजीखोतवाडीमध्ये २२ टक्के लोकांकडे वैयक्तिक शौचालये आहेत, तर ७८ टक्के लोक उघड्यावरच जातात. तेथे एकही सार्वजनिक शौचालय आढळले नाही. तसेच कावजीखोतवाडीमधये ४३ निर्धुर चुलींची संख्या व २ गांडुळखत प्रकल्प आढळले. अंकलखोपमध्ये माहितीची पातळी उच्च आहे. त्यामुळे वर्तन बदल आढळून आला. याउलट कावजीखोतवाडीमध्ये माहितीची पातळी निम्न आहे. त्यामुळे अपेक्षित वर्तन बदल आढळत नाही. दोन्हीही गावांची अर्थिक स्थिती जवळजवळ समान आहे. परंतू माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रम योग्यरितीने अंकलखोपमध्ये राबविल्याने संपूर्ण स्वच्छता अभियान पूर्णपणे यशस्वी झालेले आढळते. कावजीखोतवाडीमध्ये माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रम राबविला नसल्याने संपूर्ण स्वच्छता अभियान यशस्वी झालेला नाही.

वरील सर्व विवेचनावरून तसेच माहिती प्रशिक्षण व संवादपूर्व व संवादोत्तर परिस्थितीवरून असे सिद्ध होते की, संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमामध्ये माहिती, शिक्षण व संवादाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. माहिती शिक्षण व संवादाच्या विविध घटकांपैकी थेट व वैयक्तिक संवाद (घरभेटी, गटचर्चा) प्रशिक्षण व प्रात्यक्षिके हे घटक अतिशय परिणामकारक असून निर्णय प्रक्रियेत व वर्तन बदलात त्यांचा मोठा सहभाग आहे. प्रसारमाध्यमे सदर कामात सहाय्यकारी ठरतात. पण अनुदान आणि सक्ती या गोष्टींचा संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या प्रगतीमध्ये फारसा वाटा दिसून येत नाही.

**शिफारशी**

१) स्वच्छता अभियानामध्ये माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रम राबविताना भाषणे, पत्रके व आदेश यांच्यावर भर देण्यापेक्षा प्रत्यक्ष संवाद, घरभेटी व गटचर्चा यांच्यावर भर देण्यात यावा.

२) माहिती देणाऱ्यांना म्हणजे लोकप्रतिनिधी, सरकारी अधिकारी, महिला बचत गटांचे अध्यक्ष, अंगणवाडी सेविका यांना स्वच्छता कार्यक्रमाचे संवादाचे व तंत्रज्ञानाचे सखोल प्रशिक्षण देण्यात यावे.

३) अपरंपरागत स्वच्छता तंत्रज्ञाने केवळ माहितीच्या सहाय्याने स्वीकारली जाऊ शकत नाहीत म्हणून त्यासाठी प्रत्येक गावात प्रात्यक्षिके व कारागीर प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावेत.

४) लोककला व शाहिरी कार्यक्रम हे देखील अत्यंत परिणामकारक संवाद साधन असल्याने त्याचा वापर अभियानाच्या यशस्वितेसाठी करण्यात यावा.

५) तज्ञ व प्रशिक्षीत मनुष्यबळ असलेल्या स्वयंसेवी संस्थांना शासनाने मदत करून कावजीखोतवाडी सारख्या गावामध्ये माहिती प्रशिक्षण व संवाद कार्यक्रम घेण्यात यावेत.

**सारांश**

प्रस्तुत प्रबंधाची मांडणी एकूण सहा प्रकरणात करण्यात आलेली आहे. पहिले प्रकरण म्हणजे प्रस्तावना. स्वच्छता म्हणजे काय? अस्वच्छतेची कारणे, त्यामुळे होणारे रोग याची माहिती तसेच प्राचीन भारतातील स्वच्छताविषयक संकल्पना व ब्रिटिश काळातील स्वच्छता व आरोग्य कार्यक्रम यांचा आढावा सुरूवातीस घेण्यात आला आहे. विसाव्या शतकाच्या आरंभापासून स्वच्छता विषयक निरनिराळे प्रकल्प शासनने व विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी राबविले. या प्रकल्पांचाही आढावा येथे घेण्यात आला आहे. म. फुले, म. गांधी, संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, सेनापती बापट, आप्पासाहेब पटवर्धन यासारख्या समाजसुधारकांनी समाजामध्ये स्वच्छता व आरोग्य विषयक संकल्पना रूजाव्यात यासाठी केलेल्या कार्याचे परिशिलन करण्यात आले. कारण एका अर्थाने हे आधुनिक भारतातील माहिती, शिक्षण व संवादाचे प्रभावी कार्यक्रम होते. गांधी स्मारक निधी, सुलभ इंटरनॅशनल, सफाई विद्यालय यासारख्या संस्थांनी केलेल्या स्वच्छता विषयक कामाबाबत माहिती देण्यात आली आहे. या प्रकरणाच्या दुसऱ्या भागात राष्ट्रीय व महाराष्ट्र पातळीवरील ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा सखोल ऐतिहासिक आढावा घेण्यात आला आहे. शासनाचे ग्रामीण स्वच्छता धोरण आणि कार्यक्रम, केंद्रपुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम आणि संपूर्ण स्वच्छता अभियान या उपक्रमांचा आढावा घेऊन संपूर्ण स्वच्छता आभियानाची तत्त्वे, उद्दिष्टे, भूमिका, अंमलबजावणी व घटक या सर्वांची माहिती देण्यात आली आहे. याशिवाय महाराष्ट्रातील संपूर्ण स्वच्छता अभियान आणि त्याला आणखी समर्थ बनविण्यासाठी शासनाने चालू केलेले संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामस्पर्धा याविषयक माहिती नमूद करण्यात आली. सांगली जिल्ह्यातील संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी, त्यातील टप्पे व भौतिक प्रगती याबाबत सविस्तर विवेचन करण्यात आले आहे.

प्रकरणाच्या तिसऱ्या भागात माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमाचा अर्थ, स्वरूप व महत्व स्पष्ट करण्यात आले आहे. प्रशिक्षण व संवादाच्या कार्यात स्वयंसेवी संस्थांचे स्थान व महत्व याबाबत विवेचन करण्यात आले आहे. तसेच संपूर्ण स्वच्छता अभियानात सांगली जिल्ह्याने कोणकोणते नवोपक्रम आयोजित केले याबाबत माहिती दिली आहे. शेवटी १९३६ ते २००६ अखेर पर्यंत भारतीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमामध्ये घडून आलेल्या महत्वपूर्ण घटनांचे एकत्रीकरण सारणीरूपात सादर केले आहे.

प्रबंधाचे दुसरे प्रकरण संशोधन साहित्याच्या सर्वेक्षणासाठी वाहिलेले आहे. या प्रकरणात प्रेमलता द्विवेदी, अविक घोष, ब्लॅक आणि टॅलबोट, भाऊ धर्माधिकारी, डॉ. बिंदेश्वर पाठक, डॉ. विनुभाई पटेल इ. लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकातील स्वच्छता, आरोग्य व संवाद याविषयीच्या मतांचे परिशिलन करण्यात आले आहे. याशिवाय नियोजन मंडळ भारत सरकार, युनिसेफ, जागतिक आरोग्य संघटना, भारतीय शिक्षण संस्था, युनो, ॲकॅडमी फॉर एज्युकेशनल डेव्हलपमेंट अशा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांनी संशोधनपूर्वक सादर केलेल्या अहवालांचे विश्लेषण करण्यात आले आहे. डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांचा पीएच. डी. प्रबंध व विविध संशोधन नियतकालिकातील स्वच्छता व संवादविषयक लिखाणावर चर्चा करण्यात आली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेल्या संशोधन पद्धतीचा सखोल आढावा या प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात घेण्यात आला आहे. यात सामाजिक संशोधनाची व्याख्या सांगून या संशोधनामध्ये अन्वेषणात्मक व परिचयात्मक संशोधन पद्धती का वापरली याचो कारणमीमांसा करण्यात आली आहे. संशोधनाची उद्दिष्टे, अभ्युपगम, संशोधन क्षेत्र, तथ्य संकलनाच्या पद्धती व विश्लेषण पद्धती याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. तथ्यांचे विश्लेषण व सादरीकरण करण्यासाठी वापरण्यात आलेल्या संख्याशास्त्रीय व व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतींचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. प्रबंधाचे चौथे प्रकरण अभ्यास क्षेत्राचे स्पष्टीकरण करण्यासाठी योजण्यात आले आहे. सांगली जिल्हा त्याचे भौगोलिक क्षेत्र, आर्थिक व सामाजिक स्थिती, उद्योग व

लोकसंख्या याबाबत या प्रकरणात माहिती देण्यात आली आहे. यानंतर सांगली जिल्ह्यातील स्वच्छता कार्यक्रमाची भौतिक प्रगती निरनिराळ्या काळात बांधण्यात आलेल्या शौचालयांची संख्या याबाबत आकडेवारी प्रस्तुत करण्यात आली आहे. प्रत्यक्ष अभ्यास क्षेत्र असणाऱ्या अंकलखोप व कावजी खोतवाडी यांची दुय्यम साधनातून मिळालेली माहिती उदा. लोकसंख्या, शेतीवाडी, पीकपध्दती, संस्था, साक्षरता प्रमाण आणि स्वच्छताविषयक अंमलबजावणी या प्रकरणात सादर करण्यात आली आहे.

प्रबंधाच्या पाचव्या प्रकरणात अभ्यासक्षेत्रातील तथ्य संकलन व त्यांचे विश्लेषण सादर करण्यात आले आहे. यामध्ये तथ्य संकलनासाठी प्रत्यक्ष निरीक्षण, अनुसूची, प्रकाशचित्रे, या पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. टक्केवारीसारख्या साध्या संख्याशास्त्रीय तत्त्वांचा वापर करून उत्तरदात्यांचे आर्थिक, सामाजिक व व्यवसायविषयक वर्गीकरण करण्यात आले आहे. या वर्गीकरणाच्या विविध सारणी बनवण्यात आल्या असून त्याआधारे विविध आलेख काढण्यात आले आहेत. माहिती, शिक्षण व संवादाच्या सापेक्ष परिणामकारकतेविषयी तसेच वर्तनबदलाला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांविषयी विश्लेषण करण्यासाठी अमेरिकन व्यवस्थापन तज्ञ रेन्सिस लायकार्ट यांच्या पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. ही पद्धती वापरून विविध घटकांचा परिणामकारक मध्य गुणांक व त्याचे टक्केवारी मूल्य काढलेले आहे. यातून प्राप्त झालेल्या आकडेवारीचा उपयोग करून निष्कर्ष काढणयासाठी पुढील प्रकरणात करण्यात आलेला आहे.

प्रबंधाच्या अंतिम म्हणजे सहाव्या प्रकरणात तथ्य विश्लेषणातून, निरीक्षणातून आणि साहित्याच्या परिशीलनातून प्राप्त झालेल्या गोष्टींवरून निष्कर्ष काढण्यात आले आहेत. या निष्कर्षांच्या आधारे संशोधनाची गृहितके तपासण्यात आली आहेत व उद्दिष्टे साध्य झाली किंवा नाही यांची चर्चा करण्यात आली आहे. प्रकरणाच्या शेवटी प्रबंधातील एकूण सर्व प्रकरणांचा सारांश सादर करण्यात आला आहे व माहिती, शिक्षण आणि संवादाचा कोणत्या प्रकारे वापर करण्यात यावा याबाबत शिफारशी करण्यात आल्या आहेत.